क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१०४

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१

दिनांक : १६ एप्रिल, २००३.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १७ मार्च, २००३ (सोमवार) रोजी झालेल्या १०४ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य

निमंत्रित :
शासनाचे सचिव,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-
विधी सल्लागार
मुं.म.प्र.वि.प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

बाब क्र.१ :

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १०४ व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : १७ मार्च, २००३ (सोमवार)

वेळ : सकाळी ११.०० वाजता

सभास्थान : मा. मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष,
६ वा मजला, मंत्रालय,
मुंबई -४०० ०३२.

**उपस्थित सदस्य :**

| | |
|---|---|
| श्री.सुशीलकुमार शिंदे<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| डॉ.सय्यद अहमद<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्री.सुनिल तटकरे<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री.मंगेश श्रीधर सातमकर<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.प्रद्युमन उ.महेता<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री.अजित निंबाळकर<br>मुख्य सचिव<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री.क.चं.श्रीवास्तव<br>महापालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |

| | |
|---|---|
| श्री.रामानंद तिवारी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>शासनाचे प्रधान सचिव<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| श्री.अरुण कुमार मागो<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

<u>निमंत्रित :</u>

श्री.सुभाष लाला
शासनाचे सचिव,
नगर विकास विभाग

मा.मुख्यमंत्री म्हणून नियुक्ती झाल्यावर श्री.सुशीलकुमार शिंदे हे प्रथमच प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून बैठकीस उपस्थित राहिले होते. त्यावेळी सदस्यांनी त्यांचे सौहार्दपूर्वक स्वागत केले.

त्यानंतर, माननीय अध्यक्षांनी डॉ.सय्यद अहमद, गृहनिर्माण मंत्री, श्री.सुनिल तटकरे, नगर विकास राज्यमंत्री, श्री.अजित निंबाळकर, शासनाचे मुख्य सचिव, डॉ.सुरेश जोशी, शासनाचे प्रधान सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, श्री.आनंद कुलकर्णी, व्यवस्थापकीय संचालक, सिडको व श्री.अरुण कुमार मागो, महानगर आयुक्त व प्राधिकरणाचे सदस्य-सचिव यांचे प्राधिकरणाचे नवीन पदाधिष्ठित सदस्य म्हणून मनःपूर्वक स्वागत केले.

त्यानंतर, माजी मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा माननीय अध्यक्षांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, माननीय अध्यक्षांनी श्री.जयदत्त क्षीरसागर, माजी नगर विकास राज्यमंत्री, श्री.व्ही.रंगनाथन, शासनाचे माजी मुख्य सचिव, श्री.विनय मोहन लाल, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाचे माजी प्रधान सचिव व श्री.अनिलकुमार लखिना, माजी व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून बजावलेल्या सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, प्राधिकरणाचे माजी महानगर आयुक्त व सदस्य-सचिव श्री.अजित वर्टी यांनी केलेल्या कार्याचा मा.अध्यक्षांनी गौरवपूर्ण उल्लेख केला व त्यानंतर प्राधिकरणाने श्री.अजित वर्टी यांच्या सेवेची नोंद घेणारा ठराव मंजूर केला. (जोडपत्र)

त्यानंतर, विषयपत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक २२ ऑगस्ट, २००२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१०३व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.**

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक २२ ऑगस्ट, २००२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१०३व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ : वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रामधील एक भूखंड फूड कोर्ट, मल्टी कुसाईन रेस्टॉरन्ट आणि कार्पोरेट किचन सर्व्हिसेस व इतर संबंधित सेवा यांना भाडेपट्टयाने देण्याबाबत.**

३.१ महानगर आयुक्त यांनी सांगितले की, फूड कोर्ट, मल्टी कुसाईन रेस्टॉरन्ट आणि कार्पोरेट किचन सर्विसेस वा इतर संबंधित सेवा पुरविण्यासाठी एक भूखंड भाडेपटटयाने देण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकूण तीन निविदा प्राधिकरणास वेळेत प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी एका निविदाकाराने निविदेबरोबर धनाकर्ष जोडला नसल्यामुळे त्यास अपात्र ठरविण्यात आले आहे.

मागविण्यात आलेल्या निविदांपैकी मे.कामत हॉटेल्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांची निविदा जास्त दराची असल्यामुळे सदर निविदा प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेली आहे.

३.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९४५** :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोट कलम (२) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारीत १९९७) चा नियम ४(२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी' ब्लॉकमधील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रामधील एक वाणिज्य भूखंड क्र.सी ३०-बी ११९८.३४ चौ.मी. क्षेत्राचा ज्यावर १५०० चौ.मी. इतके अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र उपलब्ध होणारा हा भूखंड उपहारगृहासाठी 'फूडकोर्ट रेस्टॉरन्ट आणि कार्पोरेट किचन सर्व्हिसेस वा इतर संबंधित सेवा' यांना मुं.म.प्र.वि.प्रा.(जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ च्या 'डी' नमुन्यातील भाडेपट्टा कराराच्या तारखेपासून ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने मे.कामत हॉटेल्स (इंडिया) प्रा.लि. यांना वाटप करण्यासाठी निविदेतील अटी व शर्तींच्या अधीन राहून रु.५०,४००/- प्रती चौ.मी. अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र या सर्वाधिक दराची असलेली निविदा स्विकारण्यास मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** ठरावाची अंमलबजावणी करण्यास आणि आवश्यक असेल त्याप्रमाणे 'डी' नमुन्यातील भाडेपट्टा विलेखाच्या नमुन्यात योग्य ते बदल करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : वांद्रे-कुर्ला संकुल 'इ' ब्लॉकमधील अर्बन प्लाझा व पार्कचे व्यवस्थापन करणेबाबत.**

४.१ महानगर आयुक्त यांनी सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुल "इ" ब्लॉकमधील प्राधिकरणाने विकसीत केलेल्या अर्बन प्लाझा व पार्कचे व्यवस्थापन करण्यासाठी वर्तमानपत्रातून निविदा मागविण्यात आल्या होत्या. जाहिरातीला अनुसरुन प्राधिकरणातर्फे एकूण १८ निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी भरलेल्या ५ निविदा प्राधिकरणाला प्राप्त झालेल्या आहेत. मागविण्यात आलेल्या निविदांपैकी विशाल अम्यूजमेंटस् लि. यांची सर्वात अधिक दराची म्हणजेच रु.३०,३३,०००/- निविदा स्विकृत करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

४.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९४६ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोट कलम (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'इ' ब्लॉक मधील अर्बन प्लाझा व पार्क, तीन वर्षांच्या देखभालीसाठी मे.विशाल अम्यूजमेंटस् लि. यांनी रु.४०.०० लाखाचे राष्ट्रीयकृत बँकेचे ऋण सुविधा प्रमाणपत्र (Bank Credit Facility) देण्याच्या अटीवर त्यांची निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे, तसेच निविदाकारांशी योग्य तो करार करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.५ : वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी' ब्लॉकमधील एका भूखंडाचे पेट्रोल व डिझेल पंप व सर्व्हिस स्टेशन उभारणीसाठी वाटप करण्याबाबत.**

५.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये चार भूखंड पेट्रोल व डिझेल पंप व सर्व्हिस स्टेशन उभारण्यासाठी विविध तेल कंपन्यांना रु.२०,००० दर चौ.मी. भूखंड क्षेत्र याप्रमाणे अधिमुल्य आकारुन तसेच विनियमाच्या अन्य अटी व शर्तीनुसार वाटप करण्यास मान्यता

देण्यात आली होती. त्यानुसार भूखंडाचा देकार इंडो बर्मा पेट्रोलियम कं.लिमिटेड यांना देण्यात आला होता. परंतु दिलेल्या मुदतीत त्यांनी भूखंडाचा स्वीकार न केल्याने यापूर्वी प्राधिकरणाने दिलेला देकार रद्द झाला आहे तो पुनर्जिवित करण्याबाबत इंडो बर्मा पेट्रोलियम कं.लिमिटेड यांनी विनंती केली आहे. त्याप्रमाणे इंडो बर्मा पेट्रोलियम कं.लिमिटेड यांना पेट्रोल व डिझेल पंप व सर्व्हिस स्टेशन यांच्या उभारणीसाठी दिलेल्या भूखंडाचा देकार पुनर्जिवित करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांस त्यांच्या संचालक मंडळाची मान्यता घेण्यास लागणारा वेळ लक्षात घेऊन एकूण अधिमूल्य भरण्यासाठी ५ महिने इतकी मुदत देण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९४७</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ चा नियम १६ याप्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमध्ये पेट्रोल डिझेल पंप व सर्व्हिस सेंटर उभारण्यासाठी क्र.सी हा ११०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे इंडो बर्मा पेट्रोलियम कं.लिमिटेडला ०.८० इतक्या चटई क्षेत्र निर्देशांकासह ८० वर्षे भाडेपट्टयाने, रुपये २०,०००/- दर चौ.मी. भूखंड क्षेत्र याप्रमाणे अधिमूल्य आकारुन, उक्त विनियमाच्या नियम ७ प्रमाणे, तसेच उक्त विनियमाच्या अन्य अटी व शर्ती नुसार वाटप करण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** उक्त विनियमाच्या नियम ७ प्रमाणे, तसेच उक्त विनियमाच्या अन्य अटी व शर्तीनुसार वाटप करताना बाब टिप्पणीमधील परिच्छेद क्रमांक ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर भूखंड वाटपापोटी भरावयाच्या भाडेपट्टयाच्या अधिमूल्याची पूर्ण रक्कम

भरण्यासाठी विहीत मुदत, सदर देकार दिल्यापासून ५ महिने इतकी ठरविण्यास तसेच या मुदतीसाठी अधिमूल्याच्या रकमेवर कोणतेही व्याज न आकारण्याच्या तरतुदीसह नवा देकार देण्यास हे प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेच या संदर्भातील आवश्यक ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** उक्त विनियमाच्या प्रपत्र "ड" (भाडेपट्टा विलेखाचा नमुना) मध्ये योग्य ते बदल करुन याबाबतीत भाडेपट्टा करार करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : भारतीय विमा संस्था (Insurance Institute of India) यांना त्यांच्या विनंतीनुसार प्रस्तावित विमा शिक्षण संस्था कार्यालयासाठी वांद्रे-कुर्ला संकुलात भूखंड वाटप करण्याबाबत.**

६.१ महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीची संक्षिप्त माहिती दिली. भारतीय विमा संस्था (Insurance Institute of India) ही सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० या खाली नोंदणीकृत झालेली संस्था आहे. अशा संस्थांना भूखंड वाटपाचे देकार देणे किंवा त्यांच्याकडून आलेले देकार स्विकारणे याबाबत प्राधिकरणाच्या सध्याच्या जमीन विषयक नियमामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. परंतु अर्जदार संस्था ही विमा क्षेत्रातील शिक्षण देणारी एकमेव संस्था असल्याने व तीला LIC, GIC या संस्थांचे पाठबळ असल्यामुळे तसेच वांद्रे-कुर्ला संकुलाचा विकास हा आर्थिक व वित्तीय व्यवहाराशी प्रामुख्याने संबंधित असल्यामुळे विनियमातील नियम १६ प्रमाणे प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरणाने हे धोरण शिथिल करुन भारतीय विमा संस्था यांना भूखंड देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

६.२ सदरहु प्रस्तावावर चर्चा होऊन भारतीय विमा संस्था (Insurance Institute of India) यांना विमा शिक्षण संस्था कार्यालयासाठी वांद्रे-कुर्ला संकुलात भूखंड क्र.सी-४६ ज्याचे क्षेत्रफळ २९८१.१८ चौ.मी व ज्यावर ५९६२.३६ चौ.मी. अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र उपलब्ध आहे असा भूखंड रु.२५,०००/- प्रती चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराने रु.१४,९०,५९,००० एवढया अधिमूल्याने वाटप

करण्याच्या प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९४८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) नुसार जे अधिकार प्राधिकरणाला प्रदान करण्यात आलेले आहेत त्यांचा वापर करुन आणि इतर सर्व अधिकारांचा या संदर्भात उपयोग करुन प्राधिकरण वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील १८ मी. रुंद रस्त्यालगतचा सी-४६ हा २९८१.१८ चौ.मी. क्षेत्राचा व त्यावरील ५९६२.३६ चौ.मी. इतक्या बांधकाम क्षेत्राचा अनुज्ञेय असलेला भूखंड भारतीय विमा संस्था (Insurance Institute of India) यांस ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने व रुपये २५,०००/- प्रती चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराने येणारे भाडेपट्टयाचे अधिमूल्य रुपये १४,९०,५९,०००/- (रुपये चौदा कोटी नव्वद लाख एकोणसाठ हजार) इतके आकारुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम,१९७७ (सुधारित १९९७) नुसार तसेच अन्य अटी व शर्तीनुसार, बाब टिप्पणीच्या परिच्छेद-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित विविध वापरांची प्रशिक्षण संस्था व कार्यालयाची इमारत उभारण्यासाठी वाटप करण्यास, प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण भाडेपट्टेदाराबरोबर करावयाच्या भाडेपट्टा करारामध्ये आवश्यकता भासल्यास योग्य ते बदल करण्यासाठी महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मंजूर नियोजन प्रस्तावास आर-३ या सामाजिक संस्थेसाठी राखीव असलेल्या भूखंडापैकी १५०० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडाचे शाळा यासाठी फेरबदलान्वये आरक्षण.**

७.१ महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक २२.८.२००२ रोजी झालेल्या १०३ व्या बैठकीमध्ये वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी' ब्लॉकमधील राखीव भूखंडामधून १५०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड "सामाजिक संस्था" या जमीन वापरा ऐवजी "शाळा" असा फेरबदल करण्याच्या

प्रस्तावास मान्यता देण्यात आली होती. त्याप्रमाणे प्राधिकरणाने वर्तमानपत्रामध्ये त्यासंबंधी नोटीस प्रसिध्द केली होती. त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या फेरबदलाबाबत हरकती व सूचना देण्यासाठी एक महिन्याचा कालावधी देण्यात आला होता. सदरहु कालावधीमध्ये एकही सूचना वा हरकत प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदर ठराव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात यावा.

७.२ त्यानंतर, प्राधिकरणाने १०३ व्या बैठकीमध्ये मंजूर केलेल्या ठराव क्र.९३४ अनुसार केलेल्या कार्यवाहीस मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९४९ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, हे प्राधिकरण, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१)(सी) अन्वये वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी (यापुढे उक्त अधिसूचित क्षेत्र म्हणून संबोधिलेले) राज्य शासनाने नेमलेले विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने, उक्त अधिनियमाच्या कलम ४०(३) सह कलम ३७(१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा तसेच या बाबतीत सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन दिनांक २१.११.२००२ च्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात तसेच मराठी 'लोकसत्ता' व इंग्रजी 'इंडियन एक्सप्रेस' या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या उक्त अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर नियोजन प्रस्तावात करावयाच्या नियोजित फेरबदलाबाबतच्या नोटीसमधील फेरबदलांना, त्याबाबत कोणतीही हरकत वा सूचना प्राप्त न झाल्यामुळे आणि प्रस्तावित फेरबदलांमुळे कोणत्याही वैयक्तिक हितसंबंधांना बाधा येत नसल्यामुळे प्रसिध्दीपश्चात पुर्नमान्यता देत आहे व या फेरबदलांना शासनाची मंजूरी मिळविण्यासाठी ते फेरबदल शासनास सादर करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.८ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'ए' ब्लॉकमधील अधिवेशन संकुल या प्रयोजनासाठी राखीव असलेल्या भूखंडाच्या जमीन वापरात वाणिज्यिक संकुल यासाठी फेरबदलान्वये आरक्षण.**

८.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'ए' ब्लॉकमधील म्हाडाच्या मालकीचा एक भूखंड अधिवेशन संकुल या प्रयोजनासाठी राखीव होता. म्हाडाच्या विनंतीवरुन नगर विकास विभागाने ह्या आरक्षणऐवजी तो भूखंड वाणिज्य विभागात समाविष्ट करावा असे निदेश प्राधिकरणास दिले होते. त्याप्रमाणे दिनांक २२.८.२००२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १०३व्या बैठकीमध्ये मंजूर केलेला ठराव क्र.९३६ अनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार मान्यताप्राप्त नियोजन प्रस्तावात बदल करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीस प्राधिकरणाने मान्यता दिली. परंतु त्याच बरोबर संबंधित नस्ती प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या द्वारे माननीय मंत्री, गृहनिर्माण यांना माहितीसाठी सादर करावी असेही निदेश दिले.

८.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९५० :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** हे प्राधिकरण, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१) (सी) अन्वये वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी (यापुढे उक्त अधिसूचित क्षेत्र म्हणून संबोधिलेले) राज्य शासनाने नेमलेले विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने, उक्त अधिनियमाच्या कलम ४० (३) सह कलम ३७(१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा तसेच या बाबतीत सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन दिनांक २१.११.२००२ च्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात तसेच मराठी दैनिक 'लोकमत' व इंग्रजी 'दैनिक मिड डे' या स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिध्द केलेल्या उक्त अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर नियोजन प्रस्तावात 'ए' ब्लॉकमधील म्हाडाच्या मालकीच्या भूखंडावरील २.३८ हेक्टर क्षेत्रावरील "अधिवेशन सकुंल" या आरक्षणाऐवजी "वाणिज्यिक संकुल" या जमीन वापराच्या नियोजित फेरबदलाबाबतच्या नोटीसमधील फेरबदलास,

त्याबाबत कोणतीही हरकत वा सूचना प्राप्त न झाल्यामुळे आणि प्रस्तावित फेरबदलास जमीन मालक या नात्याने म्हाडाची हरकत नसल्यामुळे प्रसिध्दीपश्चात पुनर्मान्यता देत आहे व या फेरबदलास शासनाची मंजूरी मिळविण्यासाठी तो फेरबदल बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे शासनास सादर करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.९ : वडाळा भारवाहक तळातील अ-१, ब-१, ब-२ व ड-२ या इमारतीतील रिकाम्या गाळयांचे वाटप करणे.**

९.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वडाळा भारवाहक तळ येथे एकूण २८३ गाळे बांधले असून त्यापैकी ११४ गाळे अद्यापही रिकामे असून वाटप करणे बाकी आहे. प्राधिकरणाने रिकामे गाळे ठराविक दराने वितरीत करण्यासाठी जाहिरात दिली होती. एकूण ८ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यास कार्योत्तर मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव प्राधिकरणापुढे सादर केला आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, स्थावर मालमत्ता बाजारातील मंदी विचारात घेऊन, हयापूर्वी ठरविण्यात आलेला गाळयाचा दर दोन वर्षासाठी ठेवावा असाही दुसरा प्रस्ताव प्राधिकरणापुढे सादर करण्यात आलेला आहे.

९.२ बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र.२ मध्ये दिल्याप्रमाणे महानगर आयुक्तांनी गाळे वाटपासंबंधी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजुरी देण्यात आली. परंतु परिच्छेद-५ मध्ये प्रस्तावित केलेल्या धोरणासंबंधी सभासदांनी असे मत व्यक्त केले की, अधिमूल्य कमी केल्यास मागणी वाढून प्राधिकरणास उपलब्ध गाळयांचे वाटप लवकर करता येईल. मा.अध्यक्षांनीही यासंबंधी प्राप्त झालेल्या निवेदनांवर विचार करुन निर्णय घेणे योग्य ठरेल असे सांगून हा प्रस्ताव पुढे ढकलावा असे निदेश दिले.

९.३ चर्चेनंतर, प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९५१ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.२ व ३ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे ठराव क्र.९०९ अन्वये केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : यशदा-पुणे येथे नागरी प्रशिक्षण व संशोधन केंद्र स्थापनेच्या निधीसाठी रक्कम उपलब्ध करुन देणेबाबत.**

१०.१ महानगर आयुक्तांनी "यशदा", पुणे येथे नागरी प्रशिक्षण व संशोधन केंद्र स्थापण्यासंबंधी नगर विकास विभागाच्या दि. १३ जून, २००२ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्राधिकरणाने यशदाला रु. १० लाख एकदाच वर्गणीच्या स्वरुपात अंशदान (one time contribution) देण्यासंबंधीचा हा प्रस्ताव असल्याचे सांगितले. सचिव, नगर विकास विभाग (२) यांनी असे केंद्र यशदामध्ये स्थापण्यामागची भूमिका विषद केली. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रशिक्षणाची गरज व नागरी समस्यांसंबंधी संशोधनाची आवश्यकता विचारात घेता असे अंशदान प्राधिकरणाने देणे उपयुक्त ठरेल असे चर्चेतून निष्पन्न झाले. प्राधिकरणाने "यशदा" संस्थेस रु.१० लाख अंशदान देण्याचे तत्वतः मान्य केले. परंतु यासंबंधी कायदेशीर बाबी तपासून त्यानुसार वर्गणीची रक्कम वितरीत करावी असे ठरले.

१०.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९५२ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** "यशदा" च्या नागरी प्रशिक्षण व संशोधन केंद्रासाठी केवळ एकदाच वर्गणीच्या स्वरुपात (one time contribution) रु. १० लाख इतके अंशदान देण्यास प्राधिकरण याद्वारे तत्वतः मान्यता देत आहे.'

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर अंशदानाची रक्कम "यशदा" ला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६अ मध्ये प्रस्तावित सुधारणा झाल्यानंतर त्या अन्वये अथवा अधिनियमाच्या इतर अन्य तरतुदी अन्वये देता येईल का याची तपासणी करावी व त्यानंतर निधी वितरीत करण्यास व यासंबंधीची सर्व पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**<u>बाब क्र.११</u> : <u>मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचे सन २००३-२००४ या वर्षाचा वार्षिक कार्यक्रम.</u>**

११.१ महानगर आयुक्तांनी सन २००३-०४ या आर्थिक वर्षामध्ये प्राधिकरण एकूण ४७ योजना राबविणार असून, त्यासाठी सुमारे रु.१३१२.८१ कोटी इतक्या रकमेची तरतूद वार्षिक कार्यक्रमात प्रस्तावित करण्यात आली आहे असे सांगितले. त्यामध्ये मुख्यतः मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी रु.४८५ कोटी व मुंबई नागरी पायाभूत सुविधाकरीता रु.४०० कोटी रकमेची तरतूद करण्यात आली आहे. तसेच वार्षिक कार्यक्रमातील महत्वाच्या योजनांची संक्षिप्त माहिती महानगर आयुक्तांनी प्राधिकरणास दिली. प्राधिकरणाला पुढील आर्थिक वर्षात भांडवली व महसूली जमेपोटी रु.६७०.४९ कोटी इतकी रक्कम अपेक्षित आहे. प्राधिकरणास जमीन विक्रीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. तसेच ठेवीवरील व्याजाच्या दरात सतत घसरण होत असल्यामुळे ठेवीवरील व्याजाच्या उत्पन्नामध्येही घट झालेली आहे. प्राधिकरणास अपेक्षित असलेल्या एकूण उत्पनापेक्षा सुमारे रु.६५८.२२ कोटी अधिक खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पातील तूट प्राधिकरणाकडे असलेल्या ठेवीच्या रोखीकरणातून समायोजित करण्यात येणार आहे. प्राधिकरणाच्या पुढील वर्षाच्या वार्षिक कार्यक्रमावर चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाने वार्षिक कार्यक्रम सन २००३-०४ आणि सुधारीत वार्षिक कार्यक्रम २००२-०३ मान्य करण्यात आला.

सदरहु प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९५३</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** (अ) टिप्पणीसह सादर केलेल्या २००२-०३ चा (सुधारित) व २००३-०४ सालचा वार्षिक कार्यक्रम आणि २००३-०४ सालाचा मुंबई नागरी प्रकल्प फिरता निधीचा वार्षिक कार्यक्रम आणि महानगर योजना फिरता निधीचा (मेगासिटी योजना) वार्षिक कार्यक्रम संमत करण्यात येत आहे. (ब) वार्षिक कार्यक्रमांत अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशिलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१२ : मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचे सन २००३-२००४ वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.**

सन २००३-०४ चे वार्षिक अंदाजपत्रक मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९५४:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाच्या अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा २००३-२००४ सालाचा अर्थसंकल्प आणि २००२-२००३ सालचे सुधारीत अंदाजपत्रक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३(१) अन्वये मंजूर करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेला रु.६५ लाख इतका भांडवली/विकास खर्चासाठी तसेच व्यवस्थापन व देखभाली पोटी करावयाच्या खर्चास आणि सन २००२-०३ हया वर्षात अदा केलेल्या व अदा करावयाच्या एकूण रु.३० लाखाच्या अनुदानास मान्यता देण्यास हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे कार्यकारी समितीला योजना सर्वेक्षणे इत्यादी कार्यक्रम अहवालात समाविष्ट न केलेल्या आणि प्रत्येकी रु.५० लाखापेक्षा अधिक व्यय नसलेल्या बाबींना मंजूरी देण्याचा आणि या मर्यादेपेक्षा अधिक व्यय नसलेला व मंजूर अर्थसंकल्पात तरतूद न केलेला कोणताही खर्च करण्याचा अधिकार अशा प्रकरणाचा अहवाल आगामी बैठकीत प्राधिकरणाला सादर करण्याच्या अटींवर मान्यता देत आहे.

**"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी आणि महानगर योजना - फिरता निधी यांचे अंदाजित जमा व खर्च दर्शविणारे २००३-०४ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००२-०३ चे सुधारीत अंदाजास मंजूरी देत आहे."

**बाब क्र.१३ : रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचा-यांना भेटवस्तू देण्याबाबत.**

१३.१ महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, शासनाच्या विविध उपक्रमांनी २५ वर्षे पूर्ण केल्यावर रौप्य महोत्सव साजरा केला आहे. प्राधिकरण स्थापनेला २५ वर्षे जानेवारी, २००० मध्ये पूर्ण झालेली आहेत. सन २००० सालात प्राधिकरणाचा रौप्य महोत्सव साजरा करावयाचा होता. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे प्राधिकरण रौप्य महोत्सव त्या वेळेस साजरा करु शकले नाही. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी संघटनांनी विविध मागण्या केल्या होत्या. अधिकारी व कर्मचारी संघटनेने केलेल्या मागण्यांवर विशेष चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणातील कर्मचा-यांना बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे 'राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र' देण्याचे मान्य झाले होते त्यास मा.माजी मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी मान्यता दिली आहे. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रासाठी रु.१७.५३ लाख (सुमारे) इतका खर्च अपेक्षित आहे. जानेवारी,२००० रोजी प्राधिकरणाच्या सेवेत जे कर्मचारी कायम स्वरुपी होते त्यांना 'राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र' देण्यात यावे असे महानगर आयुक्तांनी सांगितले.

१३.२ सदरहू प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९५५ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना रौप्य महोत्सवी वर्षाची भेट म्हणून खालीलप्रमाणे "**राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र**" देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र देण्यास येणा-या एकूण रु.१७.५३ लाख इतक्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

| दिनांक ३१.१.२००० रोजी पूर्ण केलेला सेवा कालावधी | एकूण कर्मचारी | प्रोत्साहन म्हणून वक्षीसाची रक्कम (रुपये) | एकूण रुपये (अंदाजित) |
|---|---|---|---|
| अ) २० वर्षापेक्षा जास्त | १०९ | x ७००० | = ७.६३ लाख |
| ब) १० वर्ष ते २० वर्षापर्यन्त | १०२ | x ५००० | = ५.१० लाख |
| क) १० वर्षापेक्षा कमी | १२० | x ४००० | = ४.८० लाख |
| | ३३१ | | १७.५३ लाख |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** दिनांक ३१ जानेवारी, २००० रोजी प्राधिकरणाच्या सेवेत जे कर्मचारी कायम स्वरुपी होते त्यांना वरील तक्त्याप्रमाणे पूर्ण केलेल्या सेवा कालावधीनुसार 'राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र' देण्यात यावे. कंत्राट पध्दतीवर नेमणूक करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी यांना ही बक्षिसाची रक्कम देय असणार नाही.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत."

**बाब क्र.१४ : प्राधिकरणातर्फे विकसित केल्या जाणा-या वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी', 'जीएन' ब्लॉकमधील RG (Recreation Ground) व PG (Play Ground) साठी आरक्षित जागांचा विकास करण्यासाठी धोरण**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.१५ : वांद्रे-कुर्ला संकुलातील "जीएन" ब्लॉकमधील सुमारे ५९०० चौ.मी. क्षेत्राच्या "निवारी" वापराच्या भूखंडाचा जमीन वापर शैक्षणिक व वैद्यकीय वापराच्या सार्वजनिक सोईसाठी असा करण्यासाठी नियोजन प्रस्तावात फेरबदल करणे**

१५.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या मागील बैठकीत वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये शाळेसाठी भूखंड देण्याच्या प्रस्तावावर विचार करताना भूखंड वाटपासाठी धोरण ठरविणे आवश्यक आहे असा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे बाब टिप्पणी प्राधिकरणाला सादर करण्यात आली आहे. महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीबाबत संक्षिप्त माहिती दिली. प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलात शाळांसाठी ३ व रुग्णालयासाठी १ असे भूखंड दिले असले तरीही वांद्रे-कुर्ला संकुलाच्या सीमेवरील परिसरात भारत नगर, पत्थर नगर व बेहराम पाडा इत्यादी ठिकाणी दाट लोकवस्तीच्या झोपडपटटया व तत्सम वस्त्यांमध्ये शैक्षणिक व वैद्यकीय सोयींसाठी लागणा-या जागेचा अभाव आहे हे लक्षात घेऊन प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मान्यताप्राप्त नियोजन प्रस्तावात बदल करुन भारत नगर जवळील निवासी भूखंडाचे शैक्षणिक व वैद्यकीय सेवांच्या सार्वजनिक प्रयोजनार्थ आरक्षण

करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली तसेच त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६च्या तरतुदीनुसार आवश्यक असलेली प्रक्रीया पार पाडण्यासही मान्यता दिली.

१५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९५६</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१) (सी) अन्वये वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (३) तसेच कलम ३७ (१) अनुसार मिळालेल्या अधिकांराचा वापर करुन आणि याबाबत सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे प्रस्तावित भूखंडाच्या जमीन वापरा संदर्भातील मंजूर नियोजन प्रस्तावांत बाब टिप्पणीमध्ये नमूद केल्याप्रमाणे फेरबदल करण्यास मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (१) अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत ठरणा-या इतर अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे शासकीय राजपत्रात आणि दोन स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये नोटीस प्रसिध्द करण्यास आणि अशी नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत अशा फेरबदलाबाबत जनतेकडून आक्षेप व सूचना मागविण्यासाठी मान्यता देत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३९ अन्वये तसेच मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ ए अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे वर नमूद केलेली नोटीस प्रसिध्द करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

"**पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५१ (३) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे असे निदेश देत आहे की, महानगर आयुक्त किंवा महानगर आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला व वरिष्ठ नियोजकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी, याबाबत आलेल्या सूचना किंवा आक्षेप यावर विचार करील आणि असे आक्षेप व सूचना दाखल करणा-या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अनुसार अंतिम मंजूरीचे पुढील सोपस्कार करण्यासाठी एक अहवाल प्रस्तावित फेरबदलासह प्राधिकरणास विचारार्थ सादर करील."

**बाब क्र.१६ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प. (एमयुटीपी)**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.१७ : क्रांतीसिंह नाना पाटील मंडईच्या पुनर्विकासासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस मंजूर केलेल्या कर्जाच्या काही अटींमध्ये दुरुस्ती करणे.**

या विषयावरील चर्चेच्या वेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील बरेचसे प्राधिकरणाचे सदस्य बैठकीस उपस्थित नसल्यामुळे सदर बाब आगामी बैठकीत विचारार्थ घेण्याचा निर्णय झाला.

**बाब क्र.१८ : पु.ल.देशपांडे, कला अकादमीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी प्राधिकरणाने रु.३ कोटीचा निधी पुरविणे**

१८.१ महानगर आयुक्तांनी यांनी असे सांगितले की, पु.ल.देशपांडे कला अकादमीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी प्राधिकरणाने रु.३ कोटी रक्कम अदा केली आहे. प्राधिकरणाच्या अधिनियमानुसार ही रक्कम शासनास कर्ज अथवा अनुदानाच्या स्वरुपात देण्याची तरतूद नसल्यामुळे हे तात्पुरते कर्ज देण्यात आले आहे असे समजून कर्जाची रक्कम शासनाने परत करावी असा प्रस्ताव असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश

विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१ ए अन्वये शासन हे 'इतर प्राधिकरणे' या संज्ञेमध्ये समाविष्ट होत नसल्याने प्राधिकरणाला शासनास कर्ज अथवा अनुदानाच्या स्वरुपात वित्तीय सहाय्य देणे योग्य होणार नाही. त्यानंतर माननीय अध्यक्ष यांनी शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने सदर रक्कमेची कर्ज म्हणून मागणी केली नव्हती. तसेच अनुदान म्हणून सदर रक्कम देण्यास माजी मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी त्यास मान्यता दिली असल्यामुळे ही रक्कम अनुदान म्हणून शासनास दिली असल्याचे समजावे असे निदेश दिले. यापुढे निधीचे वितरण करताना कायदेशीर बाबी प्रथम तपासण्यात याव्यात अशीही सूचना मा.अध्यक्षांनी दिली. वरील निर्णयानुसार प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

**ठराव क्र.९५७ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, प्राधिकरण, याद्वारे पु.ल.देशपांडे कला अकादमीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी रु.३ कोटी रक्कम महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागास अनुदानाच्या स्वरुपात देण्यास कार्योत्तर मंजूरी देत आहे."

**बाब क्र.१९ : बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई ३अ प्रकल्पामध्ये फेरबदल करणे.**

१९.१ महानगर आयुक्त यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई ३ अ पाणीपुरवठा प्रकल्पासाठी प्राधिकरणाने पूर्वी मंजूर केलेल्या प्रकल्पाच्या उप-कामांच्या खर्चामध्ये बदल करण्याचा तसेच वर्ष २००३-०४ पासून प्रकल्पाच्या वार्षिक वेळापत्रकामध्ये बदल करण्याचा व प्राधिकरणाने लावलेला १% बांधिलकी आकार रद्द करण्याचा हा प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे सांगितले. महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी बांधिलकी आकार वर्ष २००२-०३ पासूनच माफ करण्याची तसेच कर्जावरील व्याजदरही कमी करण्याची व विलंब आकारासंबंधी तरतूद काढून टाकण्याची विनंती केली. यावर महानगर आयुक्तांनी कर्ज घेतलेल्या इतर संस्थांकडूनही व्याज कमी करण्याचे प्रस्ताव येत

असल्यामुळे यासंबंधी सर्वसाधारण धोरण ठरविण्यासाठी पुढच्या बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात येईल असे सांगितले त्यास मा. अध्यक्षांनी मान्यता दिली.

१९.२ चर्चेअंती, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९५८</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, प्राधिकरण, याद्वारे दिनांक १७ फेब्रुवारी, २००१ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ९९व्या बैठकीत मंजूर केलेल्या ठराव क्र. ८७५ प्रमाणे बृन्हमुंबई महानगर पालिकेच्या ३अ मुंबई पाणी पुरवठा प्रकल्पाच्या टप्पा क्र.१ च्या रु. ३७३.२३ कोटी खर्चाच्या कामासाठी मान्य केलेल्या रु. २२३.९४ कोटी कर्जाच्या अटींत पुढीलप्रमाणे बदल करण्यास मान्यता देत आहे.

१. प्रकल्पाच्या उप-कामांच्या खर्चामध्ये पालिकेने बाब टिप्पणीच्या परिशिष्ट - १ मध्ये प्रस्ताविल्याप्रमाणे बदल करणे

२. प्रकल्पाच्या सर्व उप-कामांच्या खर्चाच्या वार्षिक वेळापत्रकामध्ये व या बरोबरच एकूण प्रकल्पाच्या खर्चाच्या आणि कर्ज वापराच्या वार्षिक वेळापत्रकामध्ये बाब टिप्पणीच्या परिशिष्ट - १ मध्ये प्रस्ताविल्याप्रमाणे बदल करणे

३. कर्ज वापरासाठी लावलेला १% बांधीलकी आकार रद्द करणे`

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील मुद्दा १ ते ३ मध्ये नमुद केलेले बदल वित्तीय वर्ष २००२-०३ पासून लागू करण्यात यावेत व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरण याद्वारें महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.२० : वांद्रे-कुर्ला संकुलात पोलीस स्टेशनच्या कामासाठी आर्थिक मदत**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९५९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २१ (अ) अन्वये दिलेल्या अधिकारांचा व अन्य अधिकारांचा वापर करुन वांद्रे-कुर्ला संकुलात पोलीस स्टेशन बांधकामासाठी देण्यात आलेल्या रु.१५,००,०००/- (रुपये पंधरा लाख) आर्थिक मदतीच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे."

**बाब क्र.२१ : प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती गट मेडिक्लेम विमा पॉलिसी व इतर शासकीय योजनेनुसार करणेबाबत.**

२१.१ महानगर आयुक्तांनी बाब टिप्पणीबाबतची संक्षिप्त माहिती सादर केली. त्यानंतर महानगर आयुक्तांनी पुढे असे सांगितले की, प्राधिकरणातील कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अधिनियम, १९७५ नुसार दर वर्षी मासिक सरासरी वित्तलब्धीच्या अर्धी रक्कम अनुज्ञेय आहे व वर्षभरात न वापरलेली रक्कम कर्मचा-यांच्या पुढील वर्षात जमा करण्यात येते. तसेच अनुज्ञेय रकमेपेक्षा अधिक रकमेची वैद्यकीय खर्चास मंजूरी देण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना देण्यात आलेले आहेत. प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांना गट मेडीक्लेम विमा पॉलिसी लागू करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या दिनांक ११.१०.१९९५ रोजी झालेल्या ७९ व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदरहु प्रस्ताव राज्य शासनाच्या मान्यतेसापेक्ष मंजूर करण्यात आला होता व त्याची अंमलबजावणी शासनाची मंजूरी मिळाल्यानंतरच करावी असे ठरविले होते. सदरहु प्रस्ताव शासनाकडे पाठविल्यानंतर प्राधिकरणास गट मेडीक्लेम विमा पॉलिसी या योजनेअंतर्गत भराव्या लागणा-या प्रिमियमची रक्कम विशेष वैद्यकीय खर्चाच्या रकमेपेक्षा जास्त असल्यामुळे हा प्रस्ताव प्राधिकरणास आर्थिकदृष्ट्या फायदेशीर नसल्यामुळे सदरहु प्रस्तावाचा पाठपुरावा करण्यात आलेला नाही. परंतु गट मेडीक्लेम विमा पॉलिसीच्या

मार्गदर्शक तत्वानुसार विशेष वैद्यकीय देयकांची तपासणी करण्यात येते. ही पध्दत १९९५ सालापासून प्राधिकरणात कार्यान्वित आहे व त्यास अधिकारी व कर्मचारी संघटनेचीही सहमती आहे. तसेच शासनाने सुमारे ५ ते ६ गंभीर आजारासाठी व इतर आजाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे आदेश काढलेले आहेत तेही प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना लागू करण्यात आलेले आहेत असे नमूद केले. विशेष वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या कार्यपध्दतीस मान्यता मिळण्यासाठी प्राधिकरणापुढे हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे असेही महानगर आयुक्तांनी सांगितले. प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांना या अगोदर ज्या पध्दतीने विशेष वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात आली होती, त्याचप्रमाणे यापुढेही वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व्यवस्थापनाने करावी असे ठरले आहे.

२१.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>बाब क्र.९६०</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणातील सर्व कर्मचा-यांना प्रत्येक वर्षी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती रक्कम ही एक महिन्याच्या वित्तलब्धीच्या निम्मी रक्कम अनुज्ञेय राहील (सर्व भत्यांसहीत) तसेच न वापरलेली रक्कम पुढील वर्षात जमा करण्यात येईल.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांना सन १९९५-९६ पासून त्यावेळच्या (सन १९९५) गट मेडिक्लेम विमा पॉलिसीप्रमाणे प्रतिवर्षी रु.४३,०००/- प्रती व्यक्ती इतक्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती 'विशेष बाब' म्हणून अदा करण्यात येत आहे (यात रुग्णालयीन उपचाराकरीता रु.३७,५००/- व घरगुती उपचाराकरीता रु.५,५००/- चा समावेश राहील) ती यापुढेही नवीन वैद्यकीय योजना लागू होईपर्यंत सुरु ठेवण्यात यावी. तसेच दिर्घकालीन आजारासाठीही केलेला खर्च अनुज्ञेय असेल त्याचप्रमाणे प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचा-यांना तातडीने वैद्यकीय मदत मिळण्यासाठी अद्यावत हॉस्पिटल/रुग्णालयाशी वाटाघाटी (Tie-up with Hospital) करण्यात याव्यात.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** शासनाने गंभीर आजारांसाठी वेळोवेळी काढलेले आदेश प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांना लागू करण्यात येतात. प्राधिकरणातील कर्मचा-यांना खाजगी रुग्णालयात गंभीर व इतर दिर्घकालीन आजारांसाठी उपचार घेता येतील. परंतु खाजगी रुग्णालयात झालेल्या गंभीर स्वरुपाच्या आजारांच्या वैद्यकीय खर्चाची देयके शासन मान्य रुग्णालयाकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक राहील व त्यानंतर खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येईल.

**"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** अधिकारी/कर्मचारी यांना तातडीच्या उपचारासाठी अग्रीमाची आवश्यकता असल्यास महानगर आयुक्त यांना विशेष अग्रीम देण्याचे अधिकार प्राधिकरणाने प्रदान केलेले आहेत. त्याची त्यांनी अंमलबजावणी करावी.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचा-यांच्या वैद्यकीय उपचारासाठी तसेच त्यांच्या वैद्यकीय देयकाच्या तपासणीसाठी एका वैद्यकीय अधिका-याची नेमणूक कंत्राट पध्दतीने (Part Time) करण्यात यावी आणि त्याच्या अटी व शर्ती महानगर आयुक्त यांनी ठरवाव्यात.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** महानगर आयुक्त यांना वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या विनियम क्र.४ नुसार विहित मर्यादेपेक्षा जास्तीच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देण्यासाठी असलेले अधिकारही महानगर आयुक्त यांनी गुणवत्तेनुसार वापरावेत. "

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

*************

**जोडपत्र ...**

<u>जोडपत्र</u>

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १०४ वी बैठक

दिनांक : १७ मार्च, २००३

: ठ रा व :

"श्री.अजित वर्टी यांनी या प्राधिकरणाचे सदस्य-सचिव आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त या नात्याने दिनांक १४.०६.१९९९ पासून दिनांक १५.०१.२००३ पर्यंत केलेल्या कार्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण गौरवपूर्ण उल्लेख करीत आहे. श्री.अजित वर्टी यांना त्यांचा भावी सेवा काळ उज्वलशील जावो अशी सदिच्छा हे प्राधिकरण व्यक्त करीत आहे."

*********